684 o/c

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा/प्र.क्र.२४२/झोनिआ/ ९७५/२०१८.
दिनांक :- १६/ ०४/२०१८.

## "झोपडपट्टी निर्मुलन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ ( प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उपरोक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि. ३०/०६/२००५ नुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे आणि स्वतंत्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणुक केली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमातील तरतूदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. मॉडर्न ग्रुप यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. २०/०३/२०१७ रोजी प्रस्ताव दाखल केलेला आहे. ४४०

प्रस्तावाच्या अनुषंगाने प्र. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी न.भु.क्र. ५३,५५, ५५/१ व ५६, गणेश पेठ, पुणे या जागेवरील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन तयार केलेल्या झोपडीधारकांची प्राथमिक पात्रता यादी दि.२९/०६/२०१७ रोजी निश्चित केलेली आहे. कार्यालयीन परिपत्रक क्र.२०९, दि.०३/०६/२०१७ अन्वये सदरचे कार्यक्षेत्र उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क.१, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे अखत्यारीत येत असलेने त्यांनी दि.३१/०७/२०१७ रोजी झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी निश्चित केली आहे. सदर दि.३१/०७/२०१७ रोजी सादर केलेल्या परिशिष्ट-२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उपरोक्त जमिनीवर एकूण ४१ झोपडीधारक असून त्यापैकी पात्र निवासी ३२, पात्र बिगरनिवासी ४ व संयुक्त ० असे एकुण ३६ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत. पात्र झोपडीधारकांपैकी ३६ झोपडीधारकांनी (१००%) मे. मॉडर्न ग्रुप यांना पुनर्वसन योजनेसाठी संमती दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवर झोपडपट्टी असलेने व ती घोषित नसलेमुळे उपआयुक्त तथा सक्षम प्राधिकारी विभागीय कार्यालय क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेचा अहवाल कार्यालयीन पत्र जा.क्र.३/९२३. दि.१३/११/२०१४ अन्वये सादर केला आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३(क) (१) मधील तरतुदीनुसार अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे कार्यालयाकडील आदेश क्र.झोपुप्रा/सप्रा १/झोपुआ/प्र.क्र.२४२/१९३/२०१७. दि.०८/०१/२०१८ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. सदरचा आदेश हा – महाराष्ट्र शासनाच्या दि. जानेवारी १८-२४, २०१८ रोजीच्या राजपत्रात आणि दि.१६/०१/२०१८ रोजी दै. नवभारत व दै. सांजवार्ता या स्थानिक वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध करणेत आला आहे. व दि. १६/०१/२०१८ रोजी सदर आदेश झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आला आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश, विहीत पध्दतीने प्रसिध्द झाला असुन विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही वा विशेष न्यायाधिकरणाकडे अपिल दाखल झालेले नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पांडुरंग पोले, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे उपरोक्त अधिनियमाचे कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र हे 'झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र' म्हणुन घोषित करीत आहे. अनुसूचीमध्ये नमुद क्षेत्रातील सर्व झोपडया / बांधकामे हा आदेश प्रसिध्द झाल्यापासून ६ (सहा) आठवडयाच्या आत पाडून टाकून जमिन खुली केली पाहिजे. सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

(कृ.मा.पहा)

१. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजुर करुन प्रत्यक्ष बांधकाम सुरु केले पाहिजे.
२. विकसकाने योजनेचे काम चालु करणेपूर्वी विस्थापित होणा-या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्वखर्चाणे केली पाहिजे.
३. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात पूर्ण केले पाहिजे.
४. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
५. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारुन मुदतवाढ देण्यात येईल.
६. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.
७. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.
८. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधीत होणा-या कोणत्याही व्यक्तीस आदेश प्रसिध्द झालेपासून ४ (चार) आठवडयांच्या आत उपरोक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये विशेष न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल आणि विशेष न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**अनुसूची**

| जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| न.भु.क्र. ५३,५५ व ५६, गणेश पेठ, पुणे | ५८५.१८ चौ.मी. | **पुर्वेस -** लागू रस्ता |
| | | **पश्चिमेस -** लागू बोळ |
| | | **उत्तरेस -** लागू रस्ता |
| | | **दक्षिणेस -** लागू रस्ता |

सदर योजनेसंबंधीची सर्व कागदपत्रे संबंधितांना पाहणेसाठी या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. सदरचा आदेश हा माझे सही शिक्क्यानिशी देणेत आला आहे.

o/c

**(पांडुरंग पोले)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** १६/०४/२०१८